ePaper


## मनसेमध्ये अस्वस्थता, राज ठाकरेंना बालेकिल्ल्यात मोठमोठे धक्के बसण्याची शक्यता


वर्ष - 8 । अंक -142 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 30 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




### आतील पानांत


- 'मेन इन ब्ल्यू'चा नवा अवतार
- दिल्लीच्या ११ खेळाडूंनी केली गोलंदाजी
- योगी सरकार मोठ्या कारवाईच्या तयारीत
- न्यायालयाने कोणतीही कारवाई करू नये


## महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी धक्कादायक चेहरा?

# मुरलीधर मोहोळ यांच्या नावाची जोरदार चर्चा!

## मराठा समीकरण लक्षात घेत भाजप श्रेष्ठींकडून चाचपणी सुरू

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासाठी धक्कादायक नाव येण्याची चर्चा काही काळापासून राजकीय वर्तुळात सुरु आहे. मराठा समीकरण लक्षात घेत त्यासंदर्भातील चाचपणी भाजप श्रेष्ठींकडून सुरु असल्याचं बोललं जात आहे. भाजप सरचिटणीस विनोद तावडे आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बैठकीत तशी खलबतं झाल्याचीही चर्चा आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या ऐतिहासिक यशाचे शिल्पकार म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात आहे. परंतु असे असतानाच अचानक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या नावाची चर्चा सोशल मीडियावर सुरु झाली आहे.**



### कोण आहेत मुरलीधर मोहोळ?

कुस्तीचा आखाडा गाजवत असतानाच भाजपातून राजकारणात प्रवेश केलेले मुरलीधर मोहोळ हे पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार आहेत. पहिल्याच प्रयत्नात खासदारकी पटकवणाऱ्या मोहोळ यांच्या खांद्यावर केंद्रीय हवाई वाहतूक मंत्रालयाच्या राज्यमंत्रिपदाचीही धुरा देण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्ष संघटनेत विविध जबाबदाऱ्या पार पाडत मुरलीधर मोहोळ यांनी चार वेळा पुणे महापालिकेचे नगरसेवकपद, स्थायी समितीचे अध्यक्षपद आणि महापौरपदही भूषवले आहे. मराठा चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अमित शाह यांचे ते विश्वासू मानले जातात. दरम्यान, खुद्द मुरलीधर मोहोळ यांनी एक्स सोशल मीडियाच्या माध्यमातून या चर्चा निरर्थक असल्याचं सांगत पार्लिमेंट्री बोर्डाच्या निर्णयाकडे बोट दाखवलं आहे.

### मोहोळ काय म्हणाले?

समाजमाध्यमांमधून माझ्या नावाची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदासाठी होणारी चर्चा निर्थरक आणि कपोलकल्पित आहे.

आम्ही भारतीय जनता पार्टी म्हणून लढताना महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात लढलो. महाराष्ट्राच्या जनतेने कौलही ऐतिहासिक दिला आहे, असे मोहोळ म्हणतात.

> आमच्या भारतीय जनता पार्टीत पक्षशिस्त आणि पार्टीचा निर्णय सर्वोच्च असतो. असे निर्णय पार्लिमेंटरी बोर्डात एकमतावर घेतले जातात, ना की सोशल मीडियाच्या चर्चेवर! आणि पार्लिमेंट्री बोर्डात एकदा का निर्णय झाला, तर पार्टीचा निर्णय आमच्यासाठी सर्वोच्च असतो. म्हणूनच माझ्या नावाची सोशल मीडियात होणारी चर्चा अर्थहीन आहे, असे स्पष्टीकरण मोहोळ यांनी दिले आहे.
>
> - मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री

## भाजपचा महाराष्ट्रात पुन्हा सेम पॅटर्न!

## ना फडणवीस ना तावडे, मुख्यमंत्रिपदासाठी देणार नवीन चेहरा?

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्या असून आता गल्लीपासून दिल्लीपर्यंत मुख्यमंत्री कोण होणार? अशी चर्चा होत असलेली पाहायला मिळत आहे. २३ नोव्हेंबरला निकाल लागल्यावर अद्यापही मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा करण्यात आलेले नाही. एकनाथ शिंदे आता जवळपास



बाहेर पडलेत, त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची चर्चा होत आहे. पण भाजप सर्वांना एखादा नवीन चेहरा देत धक्का देऊ शकतं. कारण अनेकद जी चर्चा होते ते प्रत्यक्षात काही घडत नाही. 2014 मध्ये नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर भाजपने असे अनेक राज्यांमध्ये निर्णय घेतले आहेत. 2014 च्या विधानसभा निवडणुकीचे निकाल समोर आल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या नावाची चर्चा झाली. मात्र पक्षाने देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री केले होते.

### चर्चा फडणवीसांची अन् शिंदे मुख्यमंत्री

उद्धव ठाकरे यांचे सरकार पडल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री केले जाईल, अशी अटकळ बांधली जात होती, मात्र अचानक मुख्यमंत्रिपदासाठी एकनाथ शिंदे यांचे नाव पुढे आले. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले होते, त्यावेळी कुणाला याची माहितीही होऊ दिली नाही. मध्य प्रदेशात मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेल्या होत्या. लाडली ब्राह्मण योजनेत त्यांचे योगदान होते. त्यावेळी सर्व सर्वेक्षण काँग्रेस सरकार स्थापन करणार असल्याचे सांगत होते, पण भाजपने पुनरागमन केले. मात्र पक्षाने शिवराज सिंह यांना मुख्यमंत्री केले नाही.

# पिंपरी-चिंचवडला 40 वर्षांनंतर मंत्रिपद ?

## महायुतीमधील तिन्ही आमदारांमध्ये मंत्रिपदासाठी चुरस

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडला ४२ वर्षांपासून मंत्रिपदाची प्रतीक्षा आहे. महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या तिन्ही आमदारांमध्ये मंत्रिपदासाठी चुरस असतानाच आता भाजपचे जेष्ठ नेते, माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोठे विधान केले. पिंपरीचे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे यांचे ॲडव्हान्समध्ये अभिनंदन करण्यासाठी आलो असल्याचे विधान केले.**



त्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून बनसोडे यांना मंत्रिपद मिळणार का याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.विधानसभेला महायुतीत राष्ट्रवादीला केवळ पिंपरीची जागा मिळाली. पिंपरीतून अण्णा बनसोडे तिसऱ्यांदा विजयी झाली आहेत. त्यांना मंत्रीपद देण्याची मागणी शहर राष्ट्रवादीकडून करण्यात आली आहे. त्याबाबत ठराव मंजूर करून राष्ट्रवादीचे (अजित पवार) अध्यक्ष अजित पवार यांना पाठविला आहे. भाजपसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतरही महापालिकेवर राष्ट्रवादीची सत्ता आणण्याचा निर्धार अजित पवार यांनी केला आहे. सत्तेत सहभागी होताच महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार महापालिकेची सत्ता काबीज करण्यासाठी शहरातील एकमेव आमदार बनसोडे यांना मंत्रीपद देण्याची मागणी केली आहे. भाजपने शहरात विधानपरिषदेचे दोन आमदार दिले. त्यामुळे शहराध्यक्ष योगेश बहल यांना विधानपरिषदेवर संधी देण्याची मागणी पदाधिका-यांनी केली आहे.राष्ट्रवादीने मंत्रिपदासाठी आग्रह केला असताना आता भाजपचे जेष्ठ नेते, माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोठे विधान केले. चंद्रकांत पाटील यांनी विजयी झालेल्या शहरातील तिन्ही आमदारांची भेट घेतली. भोसरीचे भाजप आमदार महेश लांडगे, चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांची भेट घेतली. त्यानंतर पाटील यांचा ताफा पिंपरीचे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या आकुर्डीतील कार्यालयाकडे वळला. मोटारीतून खाली उतरताच आमदार पाटील यांनी आमदार अण्णा बनसोडे यांचे ॲडव्हान्समध्ये अभिनंदन करण्यासाठी आलो असल्याचे विधान केले. त्यामुळे बनसोडे यांना मंत्रिपद मिळणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे.त्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून बनसोडे यांना मंत्रिपद मिळणार का याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.विधानसभेला महायुतीत राष्ट्रवादीला केवळ पिंपरीची जागा मिळाली. पिंपरीतून अण्णा बनसोडे तिसऱ्यांदा विजयी झाली आहेत. त्यांना मंत्रिपद देण्याची मागणी शहर राष्ट्रवादीकडून करण्यात आली आहे.

त्याबाबत ठराव मंजूर करून राष्ट्रवादीचे (अजित पवार) अध्यक्ष अजित पवार यांना पाठविला आहे. भाजपसोबत सत्तेत सहभागी झाल्यानंतरही महापालिकेवर राष्ट्रवादीची सत्ता आणण्याचा निर्धार अजित पवार यांनी केला आहे. सत्तेत सहभागी होताच महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार महापालिकेची सत्ता काबीज करण्यासाठी शहरातील एकमेव आमदार बनसोडे यांना मंत्रीपद देण्याची मागणी केली आहे. भाजपने शहरात विधानपरिषदेचे दोन आमदार दिले. त्यामुळे शहराध्यक्ष योगेश बहल यांना विधानपरिषदेवर संधी देण्याची मागणी पदाधिका-यांनी केली आहे.राष्ट्रवादीने मंत्रिपदासाठी आग्रह केला असताना आता भाजपचे जेष्ठ नेते, माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोठे विधान केले. चंद्रकांत पाटील यांनी विजयी झालेल्या शहरातील तिन्ही आमदारांची भेट घेतली.

### बनसोडे यांचे ॲडव्हान्समध्ये अभिनंदन

त्यानंतर पाटील यांचा ताफा पिंपरीचे राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या आकुर्डीतील कार्यालयाकडे वळला. मोटारीतून खाली उतरताच आमदार पाटील यांनी आमदार अण्णा बनसोडे यांचे ॲडव्हान्समध्ये अभिनंदन करण्यासाठी आलो असल्याचे विधान केले. त्यामुळे बनसोडे यांना मंत्रिपद मिळणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

# ‘सवाई’च्या स्वरमंचावर तीन पिढ्यांचे सादरीकरण

## ‘सवाई’च्या महोत्सवात आश्वासक, बुजुर्ग कलाकारांचा सहभाग

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कंठसंगीत, वादन आणि नृत्य असा अभिजात संगीताचा त्रिवेणी आनंद देणाऱ्या ‘सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवा’त पं. अजय चक्रवर्ती, कौशिकी चक्रवर्ती आणि रिषित देसिकन अशा तीन पिढ्यांचा स्वराविष्कार रसिकांना अनुभवण्याची संधी लाभणार आहे.**



महिला कलाकारांचा सहभाग असलेला ‘मोहिनी’ हे अनोखे सादरीकरण, प्रसिद्ध गायक-संगीतकार अदनान सामी यांचे शास्त्रीय पियानो वादन आणि किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांना शिष्यांनी आपल्या गायनातून वाहिलेली स्वरांजली ही यंदाच्या महोत्सवाची वैशिष्ट्ये आहेत.आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीने मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळ क्रीडासंकुल येथे १८ ते २२ डिसेंबर या कालावधीत यंदाचा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव रंगणार आहे. महोत्सवाचे यंदा ७० वे वर्ष असून युवा पिढीच्या आश्वासक कलाकारांबरोबरच बुजुर्ग कलाकार आपली सेवा रूजू करणार आहेत, अशी माहिती देत मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी शुक्रवारी यंदाच्या वर्षी आपली कला सादर करणाऱ्या कलाकारांची घोषणा केली.‘मोहिनी’ संगीत समूह यांच्या सादरीकरण : सहभाग – सहाना बॅनर्जी (सतार), रुचिरा केदार (गायन), सावनी तळवलकर (तबला), अनुजा बोरुडे- शिंदे (पखवाज), अदिती गराडे (संवादिनी) विराज जोशी (गायन)कौशिकी चक्रवर्ती आणि रिषित देसिकन (सहगायन) पूरबायन चटर्जी (सतारवादन) सौरभ काडगांवकर (गायन) अयान अली बंगश आणि अमान अली बंगश (सरोद जुगलबंदी) आनंद भाटे (गायन) राकेश चौरासिया (बासरीवादन) आरती अंकलीकर-टिकेकर (गायन) पं. उल्हास कशाळकर (गायन) कौशिकी चक्रवर्ती आणि रिषित देसिकन अशा तीन पिढ्यांचा स्वराविष्कार रसिकांना अनुभवण्याची संधी लाभणार आहे.

### सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव रंगणार

महिला कलाकारांचा सहभाग असलेला ‘मोहिनी’ हे अनोखे सादरीकरण, प्रसिद्ध गायक-संगीतकार अदनान सामी यांचे शास्त्रीय पियानो वादन आणि किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांना शिष्यांनी आपल्या गायनातून वाहिलेली स्वरांजली ही यंदाच्या महोत्सवाची वैशिष्ट्ये आहेत.आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीने मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळ क्रीडासंकुल येथे १८ ते २२ डिसेंबर या कालावधीत यंदाचा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव रंगणार आहे.

## ‘फेस ऑफ इन्स्पिरेशन-2024’ पुरस्कारांचे वितरण

# राष्ट्रहित, सामाजिक भान जपणे हाच जीवनाचा पाया!

## माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे मत

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत ही छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकोबाराय यांची भूमि आहे. तुकोबांचे कीर्तन ऐकण्यासाठी शिवराय भंडारा डोंगरावर येत असत. ही शिवरायांची, शूरवीरांची पुण्यभूमी आहे. राष्ट्रहित आणि सामाजिक भान जपणे हा जीवनाचा पाया आहे. पांडुरंग प्रत्येकाच्या मनामनात आहे. लोकसेवा करण्याची प्रेरणा त्याच्याकडूनच मिळते, अशा भावना माजी सनदी अधिकारी व चाणक्य मंडलचे सर्वेसर्वा प्रा. अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केल्या. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे एक्सप्रेस मीडिया एंटरप्राईझेस, पुणे यांच्या वतीने ‘फेस ऑफ इन्स्पिरेशन-२०२४’ पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रा. धर्माधिकारी बोलत होते.**




कार्यक्रमासाठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे, मराठी सिने अभिनेता अंकुश चौधरी, कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक कुमार प्रॉपर्टीज लाईफस्पेस चे व्यवस्थापकीय संचालक अमेय इंद्रकुमार जैन, राष्ट्रवादी महिला काँग्रेस शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, पिंपरी-चिंचवड सराफ असोसिएशनचे अध्यक्ष रमेश सोनिगरा, महाराष्ट्र राज्य विद्युत सानियंत्रण समिती जिल्हा सदस्य संतोष सौंदणकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मानयवर उपस्थित होते.

पद्मश्री गिरीष प्रभुणे म्हणाले की, भारत देश आता अमृत महोत्सवी वाटचाल करीत आहे. गेल्या १० वर्षांत देशाने अनेक क्षेत्रात यशस्वी कामगिरी केली आहे. या भारत देशाचे नागरिक म्हणून आपण प्रत्येकाने भारतमातेची सेवा करण्याची प्रेरणा घेतली पाहिजे. अभिनेता अंकुश चौधरी म्हणाले की, ज्यांच्या कार्यामुळे समाजाला प्रेरणा मिळते. त्यांचा गौरव करण्याची संधी मला मिळाली, ही बाब माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. हा उपक्रम निश्चितच स्तुत्य आहे. मुंबईतील नाट्यगृहापेक्षा पिंपरी-चिंचवडमधील नाट्यगृह सुसज्ज आहेत, ही बाबही त्यांनी अधोरेखित केली. तसेच, प्रा. रामकृष्ण प्रेक्षागृहात सादर केलेल्या नाटकांच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या. कार्यक्रमाचे आयोजन एक्सप्रेस मीडिया एंटरप्राईझेसच्या संचालिका व न्यूज एक्सप्रेस मराठीच्या संपादिका मनिषा थोरात-पिसाळ यांनी केले. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले. सुमारे आठशे प्रेक्षकांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अधिकराव दिवे-पाटील यांनी केले. सूत्रसंचालन शुभांगी शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन संस्थेचे मार्गदर्शक संतोष सौंदणकर यांनी आणि व्यवस्थापन विलास देशमुख यांनी केले.

### विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव...

ह.भ.प. श्री.धोंडीबा बाळाजी आल्हाट, महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार,मानसोपचारतज्ज्ञ डॉ. धनंजय अष्टुरकर, संस्कार प्रतिष्ठान, ज्येष्ठ पत्रकार अविनाश चिलेकर, फिजिशियन डॉ.भाग्यश्री लहाणे-मुंडे उद्योजिका वंदना चौव्हाण, ॲड. माधवी बाळपोतदार, ॲड. सारिका परदेशी, लघु उद्योजक संघटनेचे संदीप बेलसरे, फाळके न्युरो हॉस्पिटल, गायकवाड डायबीटीज हॉस्पिटल, वास्तुकला तज्ञ माणिक बुचडे, नेक्सास ग्रुपचे नरेशकुमार पटेल आणि ग्रुप, रिव्हर नेस्टचे दादाराव जाधव आणि नरेश बर्गे, वरीष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंखे, अभिनेत्री आर्या घारे, एल-एक्सीस सोसायटी, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड कम्पुटर स्टडिज, निसर्ग राजा मैत्र जिवांचे, मेजर उदय जरांडे, नेत्रतज्ज्ञ डॉ. मयूर जावळे, रोटरी क्लब ऑफ डायनॅमिक, प्रीजम सिटी, केंब्रिज इंटरनॅशन स्कूल, अधिरा इंटरनॅशनल स्कूल, गायत्री इंग्लिश मिडिअम स्कूल, गुरूवर्य ॲकॅडमी, विकासभाउ साने सोशल फाउंडेशन आदी मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला.

---

## तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

## शंकर जगताप : चिंचवडच्या जनतेसह महायुतीच्या कार्यकर्त्यांचे मानले आभार

। चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभा मतदारसंघातून चिंचवडच्या जनतेने प्रचंड आशीर्वाद देत मला भरघोस बहुमताने विजयी केले. तुम्ही माझ्यावर जे प्रेम आणि विश्वास व्यक्त केला त्या ऋणातून मी कधी मुक्त होऊ इच्छित नाही. कारण तुमचे हे ऋणच मला पुढील काळात तुमची सेवा करण्यासाठी व आपल्या चिंचवडचा विकास करण्यासाठी नेहमी प्रेरित करीत राहील. तुम्ही माझ्यावर जो विश्वास व्यक्त केला आहे, त्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही, असा शब्द नवनिर्वाचित आमदार शंकर जगताप यांनी यावेळी दिला.**



चिंचवड विधानसभा निवडणुकीत आमदार शंकर जगताप यांनी विक्रमी लाखाच्या मताधिक्याने विजय मिळवला. या विजयानंतर रहाटणी - काळेवाडी परिसरातील मतदारांचे आणि महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी रहाटणी येथील थोपटे लॉन्स याठिकाणी आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार जगताप म्हणाले की, चिंचवड विधानसभेच्या शाश्वत विकासासाठी, तसेच आपल्या विधानसभेला विकासाच्या शिखरावर नेण्यासाठी आपण दाखवलेल्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही. आगामी काळात शैक्षणिक, आरोग्य, रोजगार, अध्यात्म, क्रीडा तसेच मुलभूत सुखसुविधांसह, माझ्या लाडक्या बहिणी, तरुण, ज्येष्ठ नागरिक, माय-माऊली यांच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध राहीन, असे आश्वासन त्यांनी यावेळी उपस्थितांना दिले. निवडणूक काळात चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षासह महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, रिपाइं (आठवले) मित्रपक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अगदी खांद्याला खांदा लावून रात्रंदिवस एक करत प्रचारासाठी अपार मेहनत घेतली. त्यांच्या या मेहनतीचे फळ म्हणूनच आपण हा विक्रमी महाविजय साकार करू शकलो, त्यांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत. त्याचबरोबर अत्यंत प्रामाणिकपणे नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहन देणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, सकल हिंदू समाज, सजग रहो मंच, बजरंग दल या सर्व मातृसंघटनांचे, तसेच निवडणूक काळात जाहीर पाठींबा दिलेल्या सर्व सामाजिक संघटना व समाज बांधवांचे आमदार जगताप यांनी विशेष आभार मानले.

### महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित...

यावेळी भाजपा प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, राष्ट्रवादीचे नेते नाना काटे, शहर कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, मा.नगरसेवक कैलास थोपटे, चंद्रकांत नखाते, बाबासाहेब त्रिभुवन, विनोद नढे, प्रमोद ताम्हणकर, नगरसेविका सुनीता तापकीर, सविता खुळे, नीता पाडाळे, ज्योती भारती, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, मंडल अध्यक्ष संदीप नखाते, युवा मोर्चा शहराध्यक्ष राज तापकीर, स्वीकृत सदस्य गोपाळ माळेकर, विनोद तापकीर, संदीप गाडे, देवीदास तांबे, बाबासाहेब जगताप, देविदास पाटील, नवनाथ नढे, सागर कोकणे, सामाजिक कार्यकर्ते संजय भिसे, जयनाथ काटे, रमेश काळे, गणेश नखाते, सोमनाथ तापकीर, नरेश खुळे, विलास पाडाळे, नेताजी नखाते, भाऊसाहेब आडूळकर, चंद्रकांत तापकीर, प्रकाश ताम्हणकर, दत्ता कदम, विजय सुतार, सुनील पालकर, सखाराम नखाते, शारदा मुंडे, दिलीप काळे, गोरक्षनाथ झोळ, मंगेश नढे, दीपक जाधव, संतोष जगताप, नरेंद्र माने, कैलास सानप, माधव मनोरे, संतोष जगताप, संजय भोसले, विशाल माळी, नामदेव शिंत्रे, कानिफनाथ तोडकर, श्याम गोडांबे, आदेश राजवाडे, शिवसेना नेते अंकुश कोळेकर, शुभम नखाते यांच्यासह सर्व महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि हजारो नागरिक उपस्थित होते.



## भूमिका

**संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लाओसमधील 'आग्नेय आशियाई संरक्षणमंत्री मंचा'च्या व्यासपीठावरून दोन संरक्षण करारांचा खास उल्लेख केला. हे करार ऑस्ट्रेलिया आणि जपानशी झालेले आहेत. पण यातून समविचारी आशियाई देशांशी भारताचे सुरक्षा सहकार्य विकसित करण्यास किती वाव आहे, हेही स्पष्ट होते.**

# चिनी आव्हानामुळे भारताला संधी!

भारताच्या संरक्षण औद्योगिक तळाच्या आधुनिकीकरणाची तातडीची गरज पाहाता, आशियाई मित्रांसोबत संरक्षण जाळे तयार करणे ही भारतासाठी निकडीची बाब आहे.यापैकी, ऑस्ट्रेलियाशी झालेला करारामुळे भारतीय आणि ऑस्ट्रेलियन लष्करी विमानांमध्ये एअर-टू-एअर इंधन भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा आहे. यामुळे दोन्ही हवाई दलांच्या कार्यक्षमतेला चालना मिळेल. तर काही दिवसांपूर्वी दिल्ली आणि टोकियोने भारतीय युद्धनौकांसाठी स्टेल्थ उपकरणांच्या संयुक्त उत्पादनावर सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. व्याप्ती मर्यादित असूनही, हे करार भारत आणि त्याच्या आशियाई भागीदारांनी प्रादेशिक सुरक्षा व्यवस्थेतील त्यांचे सामायिक हित लक्षात घेऊन पावले कशी टाकली पाहिजेत, याचे उदाहरण ठरतात. या भागातील प्रादेशिक वादांमध्ये चीनचा वाढता ठामपणा ही एक महत्त्वाची चिंताजनक बाब



आहे. भारतासह शेजारी राष्ट्रांसह विवादित सीमांवर अनेक वर्षे बेटकुळ्या दाखवत राहिलेला किंवा सरळ दहाबारा जणांची पथके घुसवून 'लांडगा-योद्धा' ठरलेला चीनसुद्धा आजकाल अनेक देशांत अनेक प्रकल्पांना सहकार्य करण्याची 'मोहक मुत्सद्देगिरी' करू लागलेला आहे. पण चीनबद्दल सावध असणेच बरे, कारण चीनचा मूड कोणत्याही वेळी सहज बदलू शकतो. बीजिंगच्या सध्याच्या सकारात्मक मुत्सद्देगिरीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे चिनी लष्करी क्षमतेचे स्वरूप. जमिनीवरील चीनच्या लष्करी वजनाच्या संदर्भातच आशियाई देशांनी पावले टाकली पाहिजेत. याउलट, भारत आणि जपानसह शेजारी राष्ट्रांच्या एकत्रित खर्चाकडे पाहून चीन स्वत:चा लष्करी खर्च वाढवत असतो, हे लपून राहिलेले नाही. चीनच्या औद्योगिक क्षेत्रासाठी वाढलेल्या पायाभूत सुविधा, गेल्या तीन दशकांतील प्रभावी लष्करी आधुनिकीकरण आणि संरक्षण संशोधन विकासाच्या कामी मोठ्या प्रमाणावर चिनी गुंतवणूक यामुळे बीजिंगचे संरक्षण उत्पादन प्रचंड प्रमाणावर पोहोचलेले आहे. उदाहरणार्थ : चीनने १९९५ ते २०२० दरम्यान ७० पाणबुड्या कार्यरत केल्या – म्हणजे वर्षाला जवळपास तीन! दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडानंतर लष्करी उत्पादनाचे एवढे प्रमाण कोणत्याही देशाचे नव्हते. भारतासारख्या मोठ्या देशांसह, चीनशेजारचा कोणताही देश चीनच्या वाढत्या संरक्षण-उत्पादनाशी आणि क्षमतेशी एकट्याने स्पर्धा करू शकत नाही, अशी स्थिती सध्या आहे. म्हणून तर, चीनचे सारेच आशियाई शेजारी गेल्या दशकभरात अमेरिकेशी सुरक्षा सहकार्य अधिकाधिक वाढवण्यासाठी तयार झाल्याचेही दिसलेले आहे. हे स्पष्ट आहे की आशियामध्ये संरक्षण-समतोल राखण्यासाठी (थोडक्यात, चीनला आटोक्यात ठेवण्यासाठी) अमेरिकेची उपस्थिती आवश्यक आहे. एक काळ असा होता जेव्हा आशियाई देश, आमचे आम्हीच स्वसंरक्षणासाठी पुरेसे आहोत, असे म्हणत होते. हे धोरण 'आशिया आशियाईंसाठीच' म्हणून ओळखले जाते. अमेरिकेसारख्या 'बाह्य शक्तीं'ना इथे येण्याचे काही कारण नाही, असाच बहुतेक आशियाई देशांचा विश्वास होता. चीन अजूनही त्याच भावनेवर खेळत आहे. म्हणूनच चीन असा युक्तिवाद करत आहे की 'बाहेरच्या लोकांनी' आशियाई शेजारी देशांसोबतच्या विवादांमध्ये हस्तक्षेप करू नये. आजही आशियातील काही देश 'आमचे आम्हीच' वर विश्वास ठेवणारे असले, तरीसुद्धा त्याचा उलटा परिणाम काय होईल हेही सर्वांना माहीत झालेले आहे. आजघडीला प्रश्न आशियातील अमेरिकन लष्करी उपस्थितीच्या राजकीय वैधतेचा नाही, तर त्याची तीव्रता आणि तग धरण्याची क्षमता यांचा आहे. पूर्व आशियातल्या संभाव्य युद्ध-क्षेत्रांमध्ये (थिएटर्समध्ये) जबरदस्त मानला जाई. पण सध्याच्या काळात, चीनची पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए) हे वर्चस्व दररोज नष्ट करत आहे.

## प्रासंगिक »

### एक गळाला...

***'महाशक्ती'ने कितीही उदार अंत:करणाने शिंदे यांस उपमुख्यमंत्रीपद देऊ केले असले तरी त्या पदास कोणताही वैधानिक अधिकार नाही.***

उत्तरेच्या पंजाबातील अकाली दल, पश्चिमेच्या गोव्यातील महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष, पूर्वेच्या ओरिसातील बिजू जनता दल, ईशान्येकडील 'आसाम गण परिषद' आणि महाराष्ट्रातील शिवसेना यांच्यात एक साम्य आहे. त्यात काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना शाखेची लवकरच भर पडेल. हे सर्व पक्ष आपापल्या ताकदीवर आपापल्या राज्यात सत्तासमर्थ होते आणि त्यांच्या खांद्यावरून भाजपने त्या त्या राज्यात प्रवेश केला. आज या पक्षांची परिस्थिती काय? अकाली दल आता कायमचा नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.प्रफुल्लकुमार महंत आणि भृगू फुकन हे एकेकाळचे केवळ आसामच्याच नव्हे तर देशाच्याही राजकारणाचे आश्वासक चेहरे. आज ते हयात आहेत की नाही हेही अनेकांस स्मरणार नाही आणि त्यांच्या पक्षाचे नावही अनेकांस आठवणार नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या दुसऱ्या कालावधीत तेथील व्यवसायात भरभराट होईल का? बहुतेक तज्ज्ञांच्या मते, टॅरिफ आणि परदेशी व्यक्तींना मायदेशी परत पाठविण्यासंदर्भात त्यांनी प्रचारादरम्यान जी आश्वासने दिली, त्याविषयी ते फारसे आग्रही राहतील, असे वाटत नाही.

# ट्रम्प खरंच स्थलांतरितांची रवानगी छावण्यांत करतील?

ही आश्वासने त्या कुंपणासारखी असतील, जे बांधल्याचे दावे केले जातात, मात्र प्रत्यक्षात ते अस्तित्वातच नसते. पण हा फुकाचा आशावाद ठरण्याची दाट शक्यता आहे. कारण ट्रम्प फार पूर्वीपासून टॅरिफ आणि स्थलांतरितांना परत पाठविण्यासंदर्भात अत्यंत आग्रही आहेत. आणि त्यांनी त्यांची ओळख असलेल्या या धोरणांची अंमलबजावणी केली नाही आणि लोकांनी त्यावरू त्यांच्याविरेधात टीकेची झोड उठविली, तर ते अंमलबजावणी करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.पण त्यांनी त्यांची ही धोरणे सौम्य केली नाहीत, अगदी निराशावादी व्यक्तीनेही कल्पिले नसेल, एवढे प्रचंड नुकसान होईल. स्थलांतरितांविरोधातील भूमिकेमुळे होणारे नुकसान दुहेरी असेल. एकीकडे अमेरिकनांना न आवडणारी अंगमेहनतीची कामे करणाऱ्या कामगारांची कमतरता भासू तर दुसरीकडे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही अमेरिका पिछाडीवर जाईल. ट्रम्प यांनी



आधीच राष्ट्रीय आणीबाणी घोषित करून अमेरिकेत मोठ्या संख्येत राहणाऱ्या बेकायदा स्थलांतरितांविरोधात लष्कर तैनात करण्याचा इशारा दिला आहे. ट्रम्प यांचे स्थलांतर धोरणासंदर्भातील मुख्य सल्लागार स्टिफन मिलर यांच्या कल्पनेतील अवाढव्य छावण्यांत या बेकायदा स्थलांतरितांना सुरुवातीच्या काळात ठेवण्यात येईल. तसे झाल्यास ते मानवी हक्क आणि नागरी स्वातंत्र्यासाठी दु:स्वप्न ठरेल. पण ट्रम्प काही अशा प्रश्नांची तमा बाळगणाऱ्यांपैकी नाहीत. टीका झालीच, तर त्याचाही त्यांना अभिमान वाटेल, कारण त्यामुळे ते अधिक मजबूत असल्याचा आभास निर्माण होईल.आर्थिक परिणाम हा वेगळा मुद्दा असेल. बहुसंख्य स्थलांतरितांना माघारी पाठविल्यास ज्या क्षेत्रांत अंगमेहनतीची कामे करणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे, त्या उद्योगांशी संबंधित उत्पादनांची दरवाढ संभवते. कृषी क्षेत्र, बांधकाम क्षेत्र आणि मांसाचे पॅकिंग करण्याच्या उद्योगांवरही याचा परिणाम होऊ शकतो. हे भयंकर असेल की अतिभयंकर असेल?ट्रम्प यांच्या धोरणांचे हे झाले या नजिकच्या भविष्यातील दुष्परिणाम. त्यापलीकडील दीर्घकालीन परिणामांकडे अद्याप लक्ष वेधले गेलेले नाही. यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरेल अमेरिकेच्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील मक्तेदारीपुढील आव्हान. अमेरिकेचे तंत्रज्ञान क्षेत्र हे जगासाठी एक मोठे आश्चर्य आहे. जगातील सर्व मोठ्या अर्थव्यवस्था सध्या साधारण एकाच स्तरावर असल्याचे दिसते. आज युरोपचा पर कॅपिटा जीडीपी अमेरिकेपेक्षा कमी आहे कारण तेथील कर्मचारी अमेरिकेतील कर्मचाऱ्यांपेक्षा कमी तास काम करतात. ते खऱ्या अर्थाने सुट्या घेतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गोंदियाजवळ शिवशाही बसला भीषण अपघात!

## 12 ते 13 प्रवाशांचा मृत्यू 15 हून अधिक प्रवासी जखमी

। भंडारा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भंडाराकडून गोंदियाच्या दिशेने येत असलेल्या एसटी महामंडळाच्या शिवशाही बस ला भीषण अपघात घडून 12 ते 13 प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर 15 हून अधिक प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना आज, शुक्रवार 29 नोव्हेंबर रोजी दुपारी 12 वाजताच्या सुमारास गोंदिया-कोहमारा राष्ट्रीय राज्य महामार्गावरील खजरी-डव्वा जवळील पुलावर घडली. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला असून पोलिसांनी घटनास्थळ गाठून बचाव कार्याला सुरूवात केली आहे. तर मृतांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार एम.एच.09 इ.एम.1273 क्रमांकांची शिवशाही बस भंडाराकडून 30 ते 35 प्रवासी घेऊन गोंदियाकडे येत असताना सडक अर्जुनी तालुक्यातील खजरी-डव्वा या गावशिवारातील नाल्याजवळ दुपारी 12 वाजताच्या सुमारास एका दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात बस चालकाका नियंत्रण सुटला. दरम्यान, बस रस्त्याच्या कडेवर उलटली. हा अपघात एवढा भीषण होता की, यात 12 ते 13 प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर 15 हून अधिक प्रवासी जखमी असल्याचे बोलले जात आहे. या घटनेची माहिती मिळताच यंत्रणेत एकच खळबळ उडाली असून बचाव पथकाने घटनास्थळ गाठून बचाव कार्याला सुरूवात केली आहे. या अपघाताची भीषणता पाहून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जखमींना तातडीने स्थानिक रुग्णालयात हलविण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातात जखमी झालेल्या काही प्रवाशांना कळकर्णी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. यात नैतिक प्रकाश चौधरी (वय 8 रा. कामठी) श्रीकृष्ण रामदास ऊके (वय 47 रा. कोसबी, भंडारा), शारदा अशोक चौहान (वय 63 रा. नागपूर), पल्लवी प्रकाश चौधरी (वय 33 रा. कामठी), लक्ष्मी धनराज भाजीपाले (वय 33 रा. गोंदिया), स्वप्रील सुभाष हेमणे ( वय 40 रा. नागपूर), विद्या प्रमोद मडेकरी ( रा. 63 रा. नागपूर), भार्गव राजेश कडू (वय 15 रा. नागपूर) धृवावर स्वप्रील हेमणे (वय 6 रा. नागपूर), टिका यशवंत दिघे (वय 17 रा. सोमलपूर) यांचा समावेश आहे. अपघाताची बातमी कळताच डव्वा येथील गावकऱ्यांनी अपघातस्थळी धाव घेत बसमध्ये अडकून पडलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. तसेच १०८ रुग्णवाहिका बोलावून त्यांना गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच डुग्गीपारचे पोलीस निरीक्षक पथकासह घटनास्थळी दाखल झाले व मदत कार्याला सुरुवात केली. जखमी व मृतक प्रवासी हे गोंदिया जिल्ह्यातीलच असल्याची शक्यता आहे.दरम्यान भीषण अपघातामुळे गोंदिया-कोहमारा मार्गावरील वाहतूक काही काळापूर्ती ठप्प झाली होती. गोंदिया जिल्हा वाहतूक पोलिसांनी लगेच घटनास्थळी दाखल होत या मार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या घटनेची माहिती मिळताच गोंदियाचे नवनिर्वाचित आमदार विनोद अग्रवाल माजी आमदार राजेंद्र जैन शासकीय महाविद्यालयात पोहोचले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर भंडारा आगारातील प्रशासकीय पथक पण घटनास्थळी दाखल झालेले आहे. गोंदिया येथे बस उलटल्यानंतर आतापर्यंत ११ मृतदेह ग्रामस्थांद्वारे बसमधून बाहेर काढण्यात आले. भंडारा-गोंदिया ही शिवशाही बस दुपारी भंडाऱ्याहून गोंदियाकडे येथे होती. बस चालकाने एका दुचाकीला ओव्हरटेक करताना त्याचे बसवरील नियंत्रण सुटले व ती उलटली. जवळपास २० फूट रस्त्यापासून बाजूला घासत गेली. त्यामुळे बसमधील ११ प्रवाशांचा मृत्यू झाला. ३० प्रवासी जखमी झाले. जखमी प्रवाशांची संख्या अधिक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मृतदेह गोंदिया येथील शासकीय महाविद्यालयात आणले असून गंभीर जखमींना गोंदिया शासकीय महाविद्यालयात दाखल केले जात आहे.भंडाराकडून गोंदियाच्या दिशेने येत असलेल्या एसटी महामंडळाच्या शिवशाही बस ला भीषण अपघात घडून 12 ते 13 प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर 15 हून अधिक प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना आज, शुक्रवार 29 नोव्हेंबर रोजी दुपारी 12 वाजताच्या सुमारास गोंदिया-कोहमारा राष्ट्रीय राज्य महामार्गावरील खजरी-डव्वा जवळील पुलावर घडली. गोंदियाकडे येत असताना सडक अर्जुनी तालुक्यातील खजरी-डव्वा या गावशिवारातील नाल्याजवळ दुपारी 12 वाजताच्या सुमारास एका दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात बस चालकाका नियंत्रण सुटला. दरम्यान, बस रस्त्याच्या कडेवर उलटली. हा अपघात एवढा भीषण होता की, यात 12 ते 13 प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे.

### बचाव कार्याला सुरुवात

या घटनेची माहिती मिळताच यंत्रणेत एकच खळबळ उडाली असून बचाव पथकाने घटनास्थळ गाठून बचाव कार्याला सुरुवात केली आहे. या अपघाताची भीषणता पाहून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यात नैतिक प्रकाश चौधरी (वय 8 रा. कामठी) श्रीकृष्ण रामदास ऊके (वय 47 रा. कोसबी, भंडारा), शारदा अशोक चौहान (वय 63 रा. नागपूर), पल्लवी प्रकाश चौधरी (वय 33 रा. कामठी), लक्ष्मी धनराज भाजीपाले (वय 33 रा. गोंदिया), स्वप्रील सुभाष हेमणे ( वय 40 रा. नागपूर), विद्या प्रमोद मडेकरी ( रा. 63 रा. नागपूर), भार्गव राजेश कडू (वय 15 रा. नागपूर) धृवावर स्वप्रील हेमणे (वय 6 रा. नागपूर), टिका यशवंत दिघे (वय 17 रा. सोमलपूर) यांचा समावेश आहे.

# अण्णा हजारे आजारी असतील

## सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी आत्मक्लेश आंदोलन पुकारले

। पुणे । प्रतिनिधी ।महाईन्यूज।

**ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी आत्मक्लेश आंदोलन पुकारले आहे. त्यांनी लोकशाहीचं वस्त्रहरण सुरू झाल्याचं म्हटलं आहे. तसंच ईव्हीएमवरही संशय घेतला आहे. दरम्यान, बाबा आढावांच्या या आंदोलनावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी भाष्य केलं आहे. त्यांनी आज माध्यमांशी संवाद साधला.**

यावेळी त्यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्यावर टीका केली. रोहित पवार म्हणाले, “भाजपाची सत्ता आली आहे, त्यामुळे अण्णा हजारे आता आंदोलन करणार नाहीत. भाजपाची सत्ता नसते तेव्हा ते आंदोलन करत असतात. पण आता सत्ता भाजपाची आलीय, तसंच ते आजारीही असतील. सत्ता भाजपाची असेल त्यामुळे त्यांना काही कष्ट करावे लागणार नाहीत.” “या वयात खूप परिश्रम करणं योग्य नाही. बाबा आढावसारखे सामाजिक कार्यकर्ते परिश्रम करतात. त्यांनी माघार घ्यावी. पण ते ऐकायच्या मनस्थितीत नाहीत. असे हाडाचे कार्यकर्ते समाज परिवर्तनासाठी कार्य करत आहेत. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. कारण लोकशाही धोक्यात आल्यासारखी वाटतेय”, असंही रोहित पवार म्हणाले.महात्मा फुले वाडा येथे डॉ. आढाव यांनी गुरुवारपासून आत्मक्लेश उपोषण सुरू केले आहे. रिक्षा पंचायतीचे नितीन पवार, संदेश भंडारे या वेळी उपस्थित होते. हे उपोषण ३० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. डॉ. आढाव म्हणाले, की अदानींचे प्रकरण घडत असताना पंतप्रधानांनी परदेशातून त्यांना पाठिंबा दिला.



### लोकशाहीचं वस्त्रहरण सुरू

या प्रकरणाची संसदेत वाच्यताही होऊ नये म्हणून जे चालले आहे ते लांछनास्पद आहे. विधानसभा निवडणुकीत सरकारी पैशाचा खुळखुळा वाजला. जनतेने या पैशाला भुलू नये. मतदानानंतर मतदानाच्या आकडेवारीमध्ये सतत बदल होतात. त्यामुळे ईव्हीएमबाबत शंका घेण्यास जागा आहे आणि ती रास्त आहे. हिंदू-मुस्लिम वाद निर्माण केले जात आहेत. मुस्कटदाबीच्या विरोधात समाजातील जागरूक वर्गाने बोलले पाहिजे. एकटा माणूसही बोलू शकतो ही लोकशाहीची शक्ती आहे.ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी आत्मक्लेश आंदोलन पुकारले आहे. त्यांनी लोकशाहीचं वस्त्रहरण सुरू झाल्याचं म्हटलं आहे. तसंच ईव्हीएमवरही संशय घेतला आहे.

# योगी सरकार मोठ्या कारवाईच्या तयारीत!

## पुन्हा चौकाचौकात लागणार आंदोलनकर्त्यांचे पोस्टर्स?

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेश राज्यातील संभळ शहरात मशिदीवरून हिंसाचार उफाळल्याची घटना काही दिवसांपूर्वी समोर आली. या प्रकरणाची सध्या जोरदार चर्चा होत आहे. दरम्यान २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या या हिंसाचारात सहभाग असणाऱ्यांविरोधात उत्तर प्रदेश सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. या हिंसाचाराच्या घटनांमध्ये कथित सहभाग असलेल्या १००हून अधिक आंदोलनकर्त्यांचे फोटो तसेच इतर माहिती असलेले पोस्टर सार्वजनिक ठिकाणी लावण्याचा विचार सरकारकडून केला जात आहे. दरम्यान सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान करणाऱ्यांविरोधात योगी सरकारने असा असा निर्णय घेण्याची ही पहिलीच वेळ नाही, यापूर्वीदेखील उत्तर प्रदेश सरकारने अशी कारवाई केली आहे.**



२०२० मध्ये नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या विरोधात राज्यात मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यात आली होती. यावेळी पहिल्यांदा उत्तर प्रदेश सरकारने पोस्टर लावण्याची ही पद्धत अवलंबली होती. ६ मार्च २०२० रोजी, उत्तर प्रदेश सरकारने लखनऊमधील प्रमुख रस्त्यांवर सीएएविरोधात आंदोलन करणाऱ्या ५७ जणांचे फोटो, नावे आणि पत्ता असलेले पोस्टर्स लावले होते. विशेष म्हणजे यामध्ये काँग्रेस नेते सदफ जाफर, रिहाई मंचचे संस्थापक मोहम्मद शोएब आणि दीपक कबीर, प्रमुख शिया धर्मगुरू कल्बे सादिक यांचा मुलगा कल्बे सिब्तेन नूरी आणि सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी आणि कार्यकर्ते एस आर दारापुरी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता.आंदोलनादरम्यान सार्वजनिक मालमत्तेचे कथित नुकसान केल्याप्रकरणी या आरोपींनी नुकसानभरपाई द्यावी असे निर्देशदेखील देण्यात आले होते. राज्य सरकारने आंदोलनकर्त्यांकडून १.५५ कोटी रूपये वसूल करण्याचा प्रयत्न देखील केला. जर ही रक्कम भरली नाही तर मालमत्ता जप्त केली जाईल असा इशारा देखील त्यांना देण्यात आला. या घटनेच्या तीन दिवसांनंतर, अलाहाबाद उच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वत:हून दखल घेतली आणि लखनऊ प्रशासनाला सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केलेल्यांचे पोस्टर हटवण्याचे निर्देश दिले. यावेळी कोर्टाने असे पोस्टर लावणे हे त्यांच्या गोपनीयतेचा भंग असल्याचे म्हटले.न्यायालयाने नंतर हे प्रकरण १६ मार्च रोजी सुनावणीसाठी सूचीबद्ध केले, पण त्याआधीच उत्तर प्रदेश सरकारने उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. दरम्यान सरकारने केलेल्या कारवाईला पाठिंबा देणारा कुठलाही कायदा नसल्याचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले, पण यावर कुठलाही अंतरिम आदेश काढला नाही. यानंतर योगी आदित्यनाथ सरकारने सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या दोषींना शिक्षा देण्यासाठी स्वत:चा कायदा आणण्याचा निर्णय घेतला. १५ मार्च या दिवशी उत्तर प्रदेश सरकारने एक अध्यादेश काढला ज्यामध्ये अशा प्रकरणांमध्ये देण्यात येणारी शिक्षा आणि प्रक्रियेची व्याख्या करण्यात आली आणि लवकरच तो उत्तर प्रदेश रिकव्हरी ऑफ डॅमेज टू पब्लिक अँड प्रायव्हेट प्रॉपर्टी अॅक्ट, २०२० म्हणून जाहीर करण्यात आला, जो उत्तर प्रदेश विधानसभेने ऑगस्टमध्ये मंजूर केला.तसेच या प्रकरणाची सुनावणी न्यायालयात प्रलंबित असताना सीएए विरोधात आंदोलन करणाऱ्यांचे फोटो आणि इतर माहिती दर्शवणारे पोस्टर ९ नोव्हेंबर रोजी सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आले. इतकेच नाही तर या पोस्टर्सवर असणाऱ्यांना फरार घोषित करण्यात आले आणि त्यांच्याबद्दल माहिती देणाऱ्यास ५,००० रूपयांचे बक्षीस जाहीर केले. या आरोपींवर उत्तर प्रदेश गँगस्टर अँड अँटी-सोशल अॅक्टीव्हिटीज (प्रिव्हेंशन) अॅक्ट १९८६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

### 274 वसुलीच्या नोटिसा मागे

जुलै २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने परवेज अरिफ टिटू यांनी दाखल केलेल्या नोटिसा रद्द करण्याची मागणींदर्भातील याचिकेवर सुनावणी घेताना, उत्तर प्रदेश सरकारला नुकसान भरपाईसाठी आंदोलकांना पाठवलेल्या पूर्वीच्या नोटिसांवर कारवाई न करण्याचे निर्देश दिले. या आदेशांचे पालन करत उत्तर प्रदेश सरकारने फेब्रुवारी २०२२मध्ये नुकसानीच्या वसुलीसाठी नवीन कायदा मंजूर करण्यापूर्वी जारी केलेल्या २७४ वसुलीच्या नोटिसा मागे घेतल्या. तसेच नवीन कायद्यानुसार या प्रकरणाकडे लक्ष देण्याचे आश्वासन दिले. या हिंसाचाराच्या घटनांमध्ये कथित सहभाग असलेल्या १००हून अधिक आंदोलनकर्त्यांचे फोटो तसेच इतर माहिती असलेले पोस्टर सार्वजनिक ठिकाणी लावण्याचा विचार सरकारकडून केला जात आहे.

---

# न्यायालयाने कोणतीही कारवाई करू नये

## संभल जामा मशीदप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संभल हिंसाचार प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला कोणताही निर्णय न घेण्याचे निर्देश दिले आहेत. शांतता आणि सुव्यवस्था राखली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणी कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशावर काही आक्षेप असल्याचेही न्यायालयाने म्हटलं आहे.**



उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणतीही कारवाई करू नये, तुम्ही हायकोर्टात का गेला नाहीत, असा सवालही न्यायालयाने याचिकाकर्त्याला विचारला आहे.सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन आयुक्तांना सीलबंद लिफाफ्यात सर्वेक्षण अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटलं आहे की प्रकरण उच्च न्यायालयासमोर सूचबद्ध होईपर्यंत दिलेल्या आदेशानुसार पुढील कारवाई केली जाईल. या खटल्यातील गुण दोषांवर आम्ही कोणतेही मत केलेले नाही, असे न्यायालयाने म्हटलं आहे.

या प्रकरणी ६ जानेवारीला पुन्हा सुनावणी होणार आहे. मात्र, आवश्यकता भासल्यास दोन्ही पक्ष अर्ज करू शकतात, असंही न्यायालयाने म्हटलं आहे.शांतता आणि सौहार्द सुनिश्चित करणे आवश्यक आहे. आम्ही ते प्रलंबित ठेवू. लवाद कायद्याचे कलम ४३ नुसार जिल्ह्याने लवाद समित्या स्थापन केल्या पाहिजेत. आपण पूर्णपणे तटस्थ राहून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही.

### सर्वेक्षण होणार नसल्याचेही स्पष्ट

दरम्यान, संभलच्या जामा मशीदीच्या संबंधित प्रकरणाची शुक्रवारी चंदौसी दिवाणी न्यायालयात सुनावणी झाली. मात्र पाहणी अहवाल दिवाणी न्यायालयात सादर होऊ शकला नाही. अधिवक्ता आयुक्त रमेश सिंह राघव यांनी सांगितलं की, २४ नोव्हेंबरला सर्वेक्षणादरम्यान झालेल्या हिंसाचारामुळे अहवाल तयार करता आला नाही. जामा मशिदीच्या वकिलाने या प्रकरणाशी संबंधित सर्व प्रती न्यायालयाकडे मागितल्या आहेत. आता मशिदीचे इतर कोणतेही सर्वेक्षण होणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# मासिक पाळीदरम्यान प्रत्येक महिन्याला बॉयफ्रेंडबरोबर ब्रेकअप

जान्हवी कपूर आपल्या अभिनयाबरोबर स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. ती शिखर पहारियाला डेट करतेय. ती त्याच्याबरोबरचे अनेक फोटो शेअर करत असते. ते दोघे कधी डेटवर तर कधी मंदिरात एकत्र दिसतात. मुकेश अंबानींचा धाकटा मुलगा अनंत अंबानीच्या लग्नातही जान्हवी कपूर आणि शिखर पहारिया एकत्र पोहोचले होते. जान्हवी अनेकदा शिखरचे कौतुक करताना दिसते.काही दिवसांपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत जान्हवीने सांगितले की, ती मासिक पाळीदरम्यान ती शिखरबरोबर ब्रेकअप करत असे. तिने या मुलाखतीत मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या त्रासाचाही उल्लेख केला. जान्हवी कपूरने



'हॉटरफ्लाय'ला दिलेल्या मुलाखतीत तिच्या एका हार्टब्रेकचा अनुभव सांगितला आणि त्यावेळी तिचा बॉयफ्रेंड शिखर पहारियाने तिला कसे सावरले, याबाबतही तिने सांगितले. ती म्हणाली, "आयुष्यात माझा फक्त एकदाच प्रेमभंग झाला होता, पण त्याच व्यक्तीने पुन्हा माझी मनधरणी केली. सुरुवातीच्या काही वर्षांत, मासिक पाळीच्या पहिल्या २-३ दिवसांत मी शिखरबरोबर ब्रेकअप करत असे. सुरुवातीचे काही महिने तो खूप हैराण झाला; पण नंतर तोही समजून गेला. ब्रेकअपनंतर दोन दिवसांनी मी रडत रडत त्याला 'सॉरी' म्हणायचे."एका मुलाखतीत जान्हवीने सांगितले होते की, पाळी आल्यावर वेळी तिला प्रचंड वेदना होतात. अंग दुखतं आणि कंबरही दुखते, असं जान्हवी म्हणाली. जान्हवीने सांगितले की ती कधी कधी कामात इतकी व्यग्र असते की मासिक पाळीच्या वेदना विसरून जाते.

# शिल्पा शेट्टी पुन्हा अडचणीत

प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांच्या अडचणी वाढल्या आहेत. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा या दोघांच्या घरावर आणि ऑफिसवर ईडीची धाड पडली आहे. जुहू येथील घर आणि ऑफिसवर ही धाड पडली आहे त्यामुळे या दोघांच्या मागे सुरु असलेलं शुक्लकाष्ठ काही संपता संपत नाही अशी स्थिती आहे.पोर्नोग्राफी नेटवर्क प्रकरणात ईडीने ही कारवाई करत धाड टाकली आहे. ईडीने गुन्हा दाखल केल्यानंतर आता शिल्पा आणि राज कुंद्रा यांचं घर तसेच ऑफिसची झडती घेतली जात आहे. 'अश्लील' चित्रपट बनवल्याप्रकरणी राज कुंद्रा याला जून २०२१ मध्ये अटक करण्यात आली होती. कुंद्रा हा या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचा दावा मुंबई पोलिस अधिकाऱ्यांनी केला होता. दोन महिने तुरुंगात घालवल्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये त्याला जामीन मिळाला आणि तो बाहेर पडला.राज कुंद्रा आणि त्याच्या कंपनीने पॉर्न फिल्म्सद्वारे फक्त बक्कळ कमाई केली नाही तर त्यांनी देशाच्या कायद्यांना बगल देण्यासाठी संपूर्ण व्यवस्था केली होती, असा दावा पोलिसांनी केला होता. पण हे प्रकरण उघडकीस आलं तरी कसं ? मुंबई पोलिसांनी यासंदर्भात ४ फेब्रुवारी २०२१ मध्ये एक केस दाखल केली होती. मालवणी पोलिस स्टेशनमध्ये या रॅकेटसंदर्भात एका मुलीने तक्रार दाखल केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. चित्रपट आणि ओटीटीवर काम मिळवून देण्याच्या नावाखाली काही लोक तरूणींना अश्लील चित्रपटात काम करण्याची जबरदस्ती करत आहेत, असे या तक्रारीत नमूद करण्यात आलं होतं.



# सुष्मिताच्या 'आर्या 3'चा दमदार टीझर आऊट

बॉलिवूड अभिनेत्री सुष्मिता सेन (SUSHMITA SEN) पुन्हा एकदा ओटीटी (OTT) विश्व गाजवण्यासाठी सज्ज आहे. सुष्मिताची 'आर्या 4' (AARYA 4) ही बहुप्रतीक्षित सीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या सीरिजचा दमदार टीझर समोर आला आहे. आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर सुष्मिता प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. शेरनी येण्याची वेळ आता आली आहे. सुष्मिताच्या 'आर्या' आणि 'आर्या 3' या वेबसीरिजने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता 'आर्या 3'च्या माध्यमातून धमाका करण्यासाठी सुष्मिता सज्ज आहे. 'आर्या 3' ही सीरिज फेब्रुवारी 2025 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हॉटस्टारवर ही सीरिज प्रेक्षकांना पाहता येईल. 2020 मध्ये आलेल्या 'आर्या' या सिनेमाच्या माध्यमातून सुष्मिताने अभिनयक्षेत्रात कमबॅक केलं होतं. तर या सीरिजच्या माध्यमातून अभिनेत्रीने ओटीटी विश्वात पदार्पण केलं होतं. या सीरिजमधील सुष्मिताच्या भूमिकेचं खूप कौतुक झालं. आपल्या मुलांच्या संरक्षणासाठी जगासोबत भांडताना अभिनेत्री दिसून आली होती. 'आर्या 3'च्या टीझरमध्ये सुष्मिता सेन म्हणत आहे,"आखिरी सांस लेनेसे पहले वह आखिरी झटका जरूर मारेगी". या सीरिजबद्दल बोलताना सुष्मिता म्हणाली,"आर्याचं माझ्या हृदयात एक वेगळं स्थान आहे. या सीरिजचा प्रत्येक भाग हा कमाल आहे. आता या सीरिजमध्ये एक वेगळी आर्या तुम्हाला पाहायला मिळणार आहे. या भूमिकेने मला खूप काही दिलं आहे.



# माझ्या मुलीचा मृत्यू कॅन्सरने झालेला नाही

अभिनेते व चित्रपट निर्माते कृष्ण कुमार यांची मुलगी तिशाचे चार महिन्यांपूर्वी निधन झालं. वयाच्या एकविसाव्या वर्षी तिनं अखेरचा श्वास घेतला. तिच्या निधनामुळे कृष्ण कुमार आणि त्यांच्या पत्नी तान्या सिंह यांच्यावर दु:खाचा मोठा डोंगर कोसळला आहे. तिशाचं निधन कर्करोगाने झालं, असं सुरुवातीला आलेल्या रिपोर्टनुसार सांगण्यात आलं होतं. मात्र, आता तिची आई तान्या यांनी मुलीच्या निधनाचं कारण कर्करोग नव्हता, असं मोठं वक्तव्य केलं आहे.तान्या यांनी गुरुवारी त्यांच्या इन्टाग्राम अकाउंटवरून एक व्हिडिओ शेअर केला. त्यामध्ये त्यांच्या मुलीच्या आठवणींतील अनेक फोटो होते. हा व्हिडिओ शेअर करीत त्यांनी यावर एक मोठी कॅप्शन लिहिली आहे. तसेच आम्ही वैद्यकीय जाळ्यामध्ये फसलो आहोत, असं त्यांनी यातून सांगितलं आहे.आपल्या पोस्टमध्ये तान्या यांनी सुरुवातीला लिहिलं, "काही दिवसांपासून मला सतत अनेक व्यक्ती नेमकं काय झालं? कसं झालं? असे काही प्रश्न विचारत आहेत. त्यांना मी आज सर्व माहिती देणार आहे. हे सत्य एखादी व्यक्ती किती नीट समजून घेते यावर अवलंबून आहे. एखादा निष्पाप जीव चुकीच्या गोष्टींमुळे अडकतो आणि अचानक समजतं की, आता फार उशीर झाला आहे. पण, शेवटी देवाच्या दारात प्रत्येकाला समान न्याय असतो आणि त्याच्यापासून कोणीही वाचू शकत नाही"

# ‘मेन इन ब्ल्यू’चा नवा अवतार!

## टीम इंडिया आता नव्या जर्सीमध्ये दिसणार

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय संघ वनडे सामने खेळताना एका नव्या रूपात दिसणार आहे. BCCI ने भारतीय संघाची वनडे सामन्यांसाठी नवीन जर्सी लॉंच केली आहे. मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात बीसीसीआयचे सचिव जय शाह आणि भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत सिंग या नवीन जर्सीच्या लॉंचिंगवेळी उपस्थित होते. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी मुंबईतील बोर्डाच्या कार्यालयात संघाच्या नवीन जर्सीचे अनावरण केले. टीम इंडियाची ही जर्सी प्रसिद्ध जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी ADIDAS ने बनवली आहे.**




टीम इंडियाची पूर्वीची जर्सी पूर्णपणे निळ्या रंगाची होती आणि तिच्या खांद्यावर तीन ADIDAS च्या लोगोचे पट्टे होते. विश्वचषकादरम्यान ते पट्टे तिरंग्याच्या रंगाचे आहेत. यावेळी देखील खांद्यावर आदिदासचे प्रसिद्ध तीन पट्टे आहेत, ज्याचा रंग पांढरा होता, पण यावेळी खांद्यावर तिरंग्याचा रंग आहे, ज्यावर हे पट्टे लावण्यात आले आहेत. या जर्सीचा निळा रंग आधीच्या जर्सीपेक्षा किंचित हलका आहे पण त्याच्या बाजूने गडद रंग देण्यात आला आहे. केवळ महिला संघच नाही तर पुरुष संघाचा कर्णधार रोहित शर्माही ही जर्सी परिधान करताना दिसणार आहे. भारतीय पुरूष संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. तर आता महिला संघ ही ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर येणार आहे. भारत महिला आणि ऑस्ट्रेलिया महिला संघामध्ये तीन सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाणार आहे. ही मालिका ५ डिसेंबरपासून खेळवली जाणार आहे.भारतीय संघ सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळत आहे. सध्या भारत मालिकेत १-० ने आघाडीवर आहे. दुसरा सामना ६ डिसेंबरपासून ॲडलेडमध्ये होणार आहे. भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी इंग्लंडविरुद्ध तीन सामन्यांची वनडे मालिका खेळणार आहे. भारतीय संघ नवीन जर्सी घालून या मालिकेत खेळताना दिसणार आहे. यानंतर चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत ही जर्सी घालून खेळताना दिसेल.भारतीय संघ वनडे सामने खेळताना एका नव्या रूपात दिसणार आहे. BCCI ने भारतीय संघाची वनडे सामन्यांसाठी नवीन जर्सी लॉंच केली आहे. मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात बीसीसीआयचे सचिव जय शाह आणि भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत सिंग या नवीन जर्सीच्या लॉंचिंगवेळी उपस्थित होते. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी मुंबईतील बोर्डाच्या कार्यालयात संघाच्या नवीन जर्सीचे अनावरण केले. टीम इंडियाची ही जर्सी प्रसिद्ध जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी ADIDAS ने बनवली आहे.

### वनडे सामन्यांसाठी नवीन जर्सी लॉंच

केवळ महिला संघच नाही तर पुरुष संघाचा कर्णधार रोहित शर्माही ही जर्सी परिधान करताना दिसणार आहे. भारतीय पुरूष संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. तर आता महिला संघ ही ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर येणार आहे. भारतीय संघ वनडे सामने खेळताना एका नव्या रूपात दिसणार आहे. BCCI ने भारतीय संघाची वनडे सामन्यांसाठी नवीन जर्सी लॉंच केली आहे.महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत सिंग या नवीन जर्सीच्या लॉंचिंगवेळी उपस्थित होते. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी मुंबईतील बोर्डाच्या कार्यालयात संघाच्या नवीन जर्सीचे अनावरण केले. टीम इंडियाची ही जर्सी प्रसिद्ध जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी ADIDAS ने बनवली आहे. भारत महिला आणि ऑस्ट्रेलिया महिला संघामध्ये तीन सामन्यांची वनडे मालिका खेळवली जाणार आहे.

टीम इंडियाची पूर्वीची जर्सी पूर्णपणे निळ्या रंगाची होती आणि तिच्या खांद्यावर तीन ADIDAS च्या लोगोचे पट्टे होते. विश्वचषकादरम्यान ते पट्टे तिरंग्याच्या रंगाचे आहेत. यावेळी देखील खांद्यावर आदिदासचे प्रसिद्ध तीन पट्टे आहेत, ज्याचा रंग पांढरा होता, पण यावेळी खांद्यावर तिरंग्याचा रंग आहे, ज्यावर हे पट्टे लावण्यात आले आहेत. या जर्सीचा निळा रंग आधीच्या जर्सीपेक्षा किंचित हलका आहे पण त्याच्या बाजूने गडद रंग देण्यात आला आहे.

टीम इंडियाची पूर्वीची जर्सी पूर्णपणे निळ्या रंगाची होती आणि तिच्या खांद्यावर तीन ADIDAS च्या लोगोचे पट्टे होते. विश्वचषकादरम्यान ते पट्टे तिरंग्याच्या रंगाचे आहेत. यावेळी देखील खांद्यावर आदिदासचे प्रसिद्ध तीन पट्टे आहेत, ज्याचा रंग पांढरा होता, पण यावेळी खांद्यावर तिरंग्याचा रंग आहे, ज्यावर हे पट्टे लावण्यात आले आहेत. या जर्सीचा निळा रंग आधीच्या जर्सीपेक्षा किंचित हलका आहे पण त्याच्या बाजूने गडद रंग देण्यात आला आहे.

# दिल्लीच्या सर्व ११ खेळाडूंनी केली गोलंदाजी

## यष्टीरक्षकानेही घेतली विकेट; नेमकं काय घडलं?

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**मुंबईच्या वानखेडे स्टेडियममध्ये दिल्ली आणि मणिपूर यांच्यातील सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सामन्यात शुक्रवारी (२९ नोव्हेंबर) एक मोठा वर्ल्ड रेकॉर्ड पाहायला मिळाला. या सामन्यात दिल्ली संघाच्या सर्व ११ खेळाडूंनी गोलंदाजी केली. टी-२० क्रिकेटमध्ये असे यापूर्वी कधीही घडले नव्हते. यापूर्वी कधीही टी-२० सामन्यात ९ पेक्षा जास्त गोलंदाजांचा वापर झाला नव्हता.**



दिल्लीविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना मणिपूरने ८ गड्यांच्या मोबदल्यात १२० धावा केल्या. सामन्यात मणिपूरची धावसंख्या ४१ धावांत ६ विकेट्स अशी होती, तेव्हा कर्णधार रेक्स सिंग (२३) आणि यष्टीरक्षक अहमद शाह (३२) यांनी सातव्या विकेटसाठी ५२ धावांची भागीदारी केली. दिल्लीच्या गोलंदाजांमध्ये मयंक रावत सर्वात महागडा ठरला. त्याने ३ षटकांत ३१ धावा दिल्या. यष्टीरक्षक फलंदाज आर्यन अरानाने देखील या सामन्यात गोलंदाजी केली. आपल्या एका षटकात त्याने १४ धावा दिल्या. आर्यन राणा आणि हिम्मत सिंग यांनी अनुक्रमे १० आणि ११ धावा दिल्या. दिल्लीकडून हर्ष त्यागी (२/११), दिग्वेश राठी (२/११), आयुष सिंग (१/११), आयुष बडोनी (१/८) आणि प्रियांश आर्य (१/२) यांनी विकेट घेतल्या. दिल्लीचा संघ स्पर्धेत अजिंक्य आहे. याआधीच्या सामन्यांमध्ये त्यांनी जम्मू आणि काश्मीरचा ३५ धावांनी तर हरियाणाचा सहा विकेट्सने पराभव केला आहे.आयुष बदोनी विकेटकीपिंग सोडून स्वत: गोलंदाजीला आला. याशिवाय आर्यन राणा, हिम्मत सिंग, प्रियांश आर्य, यश धुल आणि अनुज रावत यांनीही गोलंदाजी केली.

### दिल्लीच्या संघाने हा सामना जिंकला

दिल्लीकडून सर्वोत्तम गोलंदाजी दिग्वेश राठीने केली, ज्याने ८ धावांत २ विकेट घेतले. हर्ष त्यागीलाही २ विकेट मिळाले. यष्टिरक्षक आणि कर्णधार आयुष बदोनीलाही एक विकेट मिळाली.दिल्लीच्या संघाने हा सामना जिंकला पण मणिपूरने त्यांना सहज विजय मिळवू दिला नाही. दिल्ली फक्त ९ चेंडू शिल्लक असताना दिल्लीकडून केवळ यश धुलने नाबाद ५९ धावा केल्या. दिल्लीचे बाकीचे फलंदाज संघर्ष करताना दिसले.